(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

August -2021

ISSUE No- (CCCX) 310

WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi
Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

Editor
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor - 7.675 ISSN - 2278-9308

B.Aadhar

Peer-peer-Reviewed& Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

August -2021

ISSUE No- (CCCX) 310

WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr. Nilima D. Deshmukh
Editor
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

Dr. Archana S. Dahane
Editor
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo,

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

22	७३ व ७४ वी घटना दुरुस्ती आणि महिला सबलीकरण **प्रा.डॉ. दिनकर संतुकराव कळंबे /पंढरीनाथ रामाजी गाढे**	89
23	शारीरिक शिक्षण व महिलांचे सशक्तिकरण प्रा. गणेश श्री. विश्वकर्मा	92
24	विजया वाड यांच्या 'ऋणानुबंध' कथासंग्रहातील स्त्रीवादी कथा प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे	95
25	राजकीय सहभागातून महिला सबलीकरण **प्रा. डॉ. लक्ष्मण फुलचंद शिराळे**	102
26	महिला सबलीकरण : आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीने मुल्यमापन **प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर**	105
27	मानवाधिकार व कायद्यांच्या माध्यमातून स्त्री सबलीकरण आणि आजची स्थिती प्रा.डॉ.नंदकिशोर अरूळकर	109
28	राष्ट्रविकासात महिला सक्षमीकरणाची भूमिका डॉ.राजेश्री अप्पाराव जाधव	114
29	मानवाधिकार आणि महिला सक्षमीकरण डॉ. विनोद मारोतराव मुडे	118
30	महिला सक्षमीकरण व मानवाधिकार –एक दृष्टी डॉ.एन.डी.बालपांडे	124
31	महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय प्रा. डॉ. भुरके नागोराव संभाजी	129
32	स्त्रीयांवरील अत्याचार एक समस्या डॉ. सुनिलदत्त एस. गवरे	133
33	ग्रामीण आणि शहरी विभागातील किशोरवयीन मुलींच्या पोषणाचा तुलनात्मक अभ्यास. कु. मालती पांडुरंग सातव	138
34	भारतातील स्त्रियांचा बदलता दर्जा: एक अध्ययन **डॉ.गजानन संतोषराव कुबडे**	142
35	भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण **प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे**	145
36	मानवी हक्क आणि महिला सबलीकरण डॉ सौ. वंदना विनायक नढे	149
37	भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील विदेशी स्त्रियांचे योगदान प्रा.श्री. अमोल अरूण कुंभार	153
38	स्त्रियांचे पोषण आणि आरोग्य समस्या **Rupali Amit Tapre(Bargal)**	158
39	मानव अधिकार आणि महिला सबलीकरण प्रा. डॉ वैशाली शांताराम बागुल	164
40	वृध्द स्त्रियांच्या पोषणविषयक सगस्या एक अध्ययन प्रा.वनिता किसनराव बोदडे	170
41	The Empowerment of Indian Women by Dr. B.R. Ambedkar **Dr. Sanjay G. Kulkarni**	174

.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 310 (CCCX)
ISSN : 2278-9308
August, 2021

भारतातील स्त्रियांचा बदलता दर्जा: एक अध्ययन

डॉ.गजानन संतोषराव कुबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वाशिम, जि. वाशिम.
मो क्र. ९९२१५४४९६२ ई.मेल. gskubade@gmail.com

प्रस्तावना:

प्राचीन काळापासून भारतात स्त्रियांना खूप आदराचे स्थान होते. भारतीय स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य होते. सर्वच धर्मांनी महिलांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. परंतु कालांतराने लिखाणाचा चुकीचा अर्थ किंवा त्यात घालघुसड यामुळे महिलांवर अनेक बंधने टाकण्यात आली. खरे तर स्त्रीशिवाय पुरुषाचे जीवन अधुरे असते.पुरुष हा एका दृष्टीने रानटी, भटका व शिकारी आहे. त्याला माणसाळण्याचे, माया ममता शिकविण्याचे व कुटुंबवत्सल बनविण्याचे कार्य स्त्रिने केले आहे. आपली प्रगती करायची असले किंवा मोक्षप्राप्ती करुन घेण्यासाठी **लक्ष्मी**ची आराधना करावी लागते. ज्ञानप्राप्तीसाठी **सरस्वती**ची आराधना तर दुर्जनांचा नाश करण्यासाठी **दुर्गा** पुजा करावी लागते. यावरुन एकच दिसते की, मानवाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्त्रीचीच आराधना करावी लागते व तिलाच मानाचे स्थान होते. वैदिक काळात मनुने मनुस्मृतीत पुरुषप्रधान संस्कृतीचे बीजारोपण केले आहे व स्त्रियांना दुय्यम स्थान दिले आहे.

भारतात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'चूल आणि मूल' एवढयापूरताच मर्यादित होता. स्त्रियांवर वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार होत होते, महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक या सर्वच बाबतीत दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जात होती. स्त्री म्हणजे बाळाला जन्म देणारे यंत्र अशीच समजूत होती. मुलीचे विवाह अत्यंत कमी वयात होत असत. पतीचा मृत्यू झाला तर संपूर्ण जीवन तिला विधवा म्हणून जगावे लागत होते. किंवा सती जावे लागत होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांना हक्काची जाणीव होत नव्हती. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत तिला गौण स्थान होते. तिच्या आरोग्याची काळजी घेतला जात नव्हती, स्त्री बालमृत्यूंचे प्रमाण मोठे होते. माता मृत्यूचे प्रमाणही मोठे होते. सदर शोधनिबंधात भारतातील महिलांचा बदलता दर्जा अभ्यासण्यात आला आहे. तसेच वेगवेगळ्या काळात त्यांच्या जीवनात झालेल्या बदलाचा परामर्श घेण्यात आला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टये:

१.भारतातील महिलांच्या बदलत्या परिस्थितीचा आढावा घेणे.
२.भारतातील स्त्रियांच्या वर्तमान स्थितीचा अभ्यास करणे.

अभ्यास पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. सदर अध्ययनासाठी भारतीय महिलांच्या ऐतिहासिक आणि सद्यस्थितीचे विवेचन करणाऱ्या ग्रंथांचे, लेखांचा आढावा घेण्यात आला आहे.

महिलांचा बदलता दर्जा

१.वैदिक काळ

इ.स.पूर्व ६०० वर्षांपर्यंतचा काळ या काळात भारतातील स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा होता. या काळात स्त्रियांनी पुरुषाच्या बरोबरीने हक्क व अधिकार उपभोगले होते. स्त्रिया वेदाचा अभ्यास करित. त्याकाळात घोषा अबला, लोपामुद्रा, विश्वंभरा या स्त्रियांनी वेदाची रचना केली होती. तसेच त्या सामाजिक जीवनात, स्पर्धेतही सहभागी होत असत. म्हणजेच वैदिक काळात कन्या व पुत्र समानच मानले जात होते.

२.महाकाव्यांचा काळ

इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा काळ महाकाव्याचा काळ होय. रामायण, महाभारताच्या कालखंडात स्त्रियांचा दर्जा ढासळण्यास सुरुवात झाली. हिंदू संहिताकारांनी स्त्रिया वेदाचा अभ्यास करण्यास पात्र नाहीत असे जाहीर केले. हळूहळू समाजात मुलीपेक्षा मुलगा श्रेष्ठ मानण्याची प्रथा सुरु झाली. वैदिक काळात स्त्रियांनी उपभोगलेला उच्च दर्जा आणि सन्मान महाकाव्याच्या काळात झपाट्याने घसरता स्त्रियांना कनिष्ठ व दुय्यम स्थानावर ढकलण्यात आले.

३.बहामनी काळ

मुस्लिम आक्रमणानंतर स्त्रियांचे स्थान अधिकच दुय्यम होत गेले. या कालखंडात महिलांना अनेक कुप्रथांना तोंड द्यावे लागले. बुरखापद्धत, सतीप्रथा, केशवपन अशा विविध प्रथा बहामनी काळात रुढ झाल्या. महिलांना गौण स्थान प्राप्त झाले. चूल आणि मूल या चौकटीत महिलांना बंदिस्त करण्यात आले.

४. शिवकाळ

शिवकाळात व पेशवाईत कुटुंबात स्त्रियांना मानाचे स्थान होते. राजघराण्यातील आणि सरदार घराण्यातील स्त्रियांना लेखन, वाचन, शिक्षणाच्या संधी होत्या. अध्यात्म आणि राजकारण या क्षेत्रात ज्या स्त्रियांना संधी मिळाली त्यांनी कर्तृत्व गाजविले आणि पुरुषांनीही ते सहज मान्य केले. रुढी, परंपरा धर्माच्या नावाखाली चालणारास्त्रियांच्या बाबतीतला कर्मठपणा, सतीप्रथा, बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवा स्त्रियांची दयनीय स्थिती, कुटुंबातील होणारी घुसमट, शारीरिक छळ, बलात्कार या सर्व गोष्टींनी स्त्रिया गांजलेल्या होत्या. जन्माचे भोग म्हणून हे अन्याय, अत्याचार सहन करत होत्या. शिक्षण नाही, संपत्तीत हक्क नाही, स्वत:च्या उत्पन्नाचे साधन नाही अशी दयनीय व लाचार अवस्था होती.

५. ब्रिटीश काळ

ब्रिटिश पूर्व काळात स्त्री पुरुष यातील जी दरी होती ती भरुन काढण्याचा प्रयत्न ब्रिटीश राजवटीत झाला. या राजवटीत काही माणूसकीचे व काही नागरिकत्वाचे अधिकार मिळाले. स्त्रीया व्यक्तीगत जीवनाला, कर्तृत्वाला थोडी फार प्रतिष्ठा मिळाली. शिक्षणाची संधी मिळू लागली. राजाराम मोहनराय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती यांसारख्या समाज सुधारकांनी स्त्री सुधारणांचा पुरस्कार केला. राजाराम मोहन रॉय यांनी १९ व्या शतकाच्या प्रारंभी सतीची चाल बंद केली.

६. स्वातंत्र्योत्तर काळ

स्वातंत्र्यपूर्व काळातच महिला विकासाच्या कार्याला सुरुवात झाली होती. स्वातंत्र्यानंतर भारतात स्त्री पुरुष समानतेसाठी निश्चित प्रयत्न करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या सहाय्याने स्त्रीसक्षमीकरणासाठी कृतिशील भूमिका घेतली होती. स्वातंत्र्य, समता, बंधूता राज्यघटनेची आधारत्रयी आहे. भारत सरकारने महिला सक्षमीकरणासाठी अनेक कायदे केले. अनेक धोरणे अंमलात आणली. पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न झाले असले तरी अजूनही महिलांचे स्थान दुय्यम व गौणच आहे.

भारतातील स्त्रियां आणि वर्तमान स्थिती

भारतात महिलांचे स्थान दुय्यम आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेले असले तरी अपेक्षित यश प्राप्त झालेले नाही. २०११ च्या जनगणनेनुसार दर १००० पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ९४० आहे. तर २५.९७ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत.

१.भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान

भारतीय समाजात महिलांना दुर्लक्षित केल्यामुळे समाजाला अपंगत्व आले आहे. स्त्रीने घराबाहेर पडून विविध क्षेत्रांत नेतृत्व करावे. अर्थोत्पादन करावे असा समाजाचा आग्रही नाही. गरज पडली तर त्यांनी काम करावे नाही तर घराण्याची इज्जत सांभाळावी असा अलिखित करार असतो सामाजिक रुढी, परंपरा सांभाळून कन्या, पत्नी, माता या नात्याने महिलांचे आयुष्य खर्च होत आहे. आज भारतात भ्रुणहत्येचा गंभीर प्रश्न आहे. भारताच्या १०० कोटी लोकसंख्येपैकी ४९ कोटी ६० लाख महिलांना अशा समस्यांना तोंड द्यावे लागते.

२.भारतीय स्त्रियांचे आर्थिक स्थान

भारतीय महिला पुरुषांबरोबर काम करतात पण त्यांना तुलनेने कमी वेतन मिळते. त्यांच्या कामाची नोद होत नाही. कामाचे वेतन पुरुषांकडेच द्यावे लागते तिचा त्या मोबदल्यावर हक्क नसतो. असंघटित क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे कमी वेतन, रोजगाराची असुरक्षितता या समस्या आहेत. कृषी क्षेत्रात स्त्री मजुरांचे प्रमाण ७४ टक्के आहे. येथेही महिला शेतमजुरांना पुरुषांपेक्षा कमी मजुरीवर काम करावे लागते.

३.भारतातील स्त्रियांचे शैक्षणिक स्थान

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण साक्षरता ७४.०४ टक्के असून पुरुष साक्षरता ८२.१४ टक्के व स्त्री साक्षरता ६५.४६ टक्के आहे. महाराष्ट्रात स्त्री साक्षरता ६९.८७ टक्के आहे. पुरुषांपेक्षा महिलांचे साक्षरता प्रमाण कमी आहे. उच्च शिक्षणातील महिलांचे प्रमाण फक्त ०.७ टक्के आहे. शिक्षणाबाबत महिलांची स्थिती चिंताजनक आहे. भारतातील लोकसंख्येत निम्मी लोकसंख्या महिलांची असताना स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी असणे म्हणजे मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ट असणे होय.

४. भारतातील स्त्रियांचे राजकीय स्थान

भारतात महिलांची लोकसंख्या ५० टक्के असूनही राजकारणातील सहभाग फक्त १ टक्के इतका आहे. महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के महिलांना आरक्षण करण्यात आले. मात्र नावापुरत्या सत्तेत असून सर्व निर्णय पुरुषाकडून घेतले जातात. युनोच्या एका जागतिक पाहणीनुसार भारतातील महिलांचे राजकारणातील सहभागाचे प्रमाण सर्वात कमी ७ टक्के आहे.

५. भारतातील स्त्रियांचे आरोग्य विषयक स्थान

भारतात महिलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. आर्थिक अडचणीमुळे महिलांना पुरेशा कॅलरीज मिळत नाहीत. शहरी महिलांपेक्षा ग्रामीण व आदिवासी महिलांच्या आरोग्याकडे अधिकच दुर्लक्ष केले जाते. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुषांना ताजे व सकस अन्न देऊन महिला स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भारतातील महिलांचे सरासरी आयुर्मान ५९ वर्षे कमी आहे. विकसित देशात महिलांचे सरासरी आयुर्मान ७८ वर्षे आहे. भारतात महिलांची सद्य:स्थिती विविध स्तरांवर हलाखीची बनली आहे. शासनाने त्यासाठी उपाययोजना केलेली असली तरी स्त्रियांच्या दर्जात फारसा फरक पडलेला दिसत नाही.

थोडक्यात, महिलांच्या विविध कालखंडातील सामाजिक दर्जाच्या आढाव्यावरुन महिलांचे जाणिवपूर्वक सबलीकरण घडवून आणणे का आवश्यक होते याची जाणीव होते. महिलांच्या सामाजिक दर्जाचा विचार करताना प्रत्यक्ष व्यवहारात महिला कोणता दर्जा उपभोगत होत्या व तात्त्विक स्तरावर महिलेला कोणता दर्जा प्रदान केला जात होता याचा विचार होणे आवश्यक आहे. कारण तात्वीक स्तरावरील वैदिक कालखंडापासून हिंदू संस्कृतीने महिलांना पुरुषाच्या बरोबरीचे स्थान दिले जाते. तसेच उच्च वर्गीय महिलांना शिक्षणाची संधी होती. या आधारावर हिंदू समाजात स्त्री पुरुष भेद नव्हता असे म्हटले जाते. पण व्यावहारिक स्तरावर बहुपत्नीत्व, केशवपनाची प्रथा, सतीप्रथा, विधवा विवाहास बंदी, कुटुंबात मर्यादित अधिकार अशी दयनीय अवस्था महिलांची होती म्हणूनच महिलांच्या दर्जाचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय स्त्री ला स्वातंत्र्य मिळाले असले तरी सामाजाचे अप्रत्यक्ष बंधन, वैचारिक जोखडाच्या माध्यमातून आजही स्त्रियांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक व सामाजिक शोषण केले जाते. त्यामुळे स्त्रियांना वरवर पाहता मानाचे व महत्त्वाचे स्थान दिले जात असले तरी आजही त्यांची परिस्थिती **जैसे थी** अशीच आहे. विकासाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारतात आज स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपले स्थान कायम केले असून त्याला सुरक्षित करणे त्यांच्या विकासाचे प्रमुख दालन आहे असे म्हटल्यास अतिशोयोक्ती होणार नाही.

संदर्भ ग्रंथ:

१. पाटील ली., मुलीचा बदलता सामाजिक दर्जा, निरंतर शिक्षण धारा, त्रैमासिक.
२. आपटे ज.श., रोडे पु., भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
३. अर्थवेध, २००६ मराठी अर्थशास्त्र परिषद, ३० वे राष्ट्रीय अधिवेशन.
४. गुप्ता कमलेशकुमार (२००५), महिला सशक्तीकरण, बुक एनक्लेव्ह, जयपूर.
५. पाटील शोभा, (२००७), स्त्रीवादी, विचार आणि समिक्षांचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.